*अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग*

# पुणे विद्यापीठ

## निवडणूक सूचना

**(एक)** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २५ (२)(वाय) मधील तरतूदीनुसार पूर्णवेळ पदव्युत्तर शिक्षकांमधून **५ (पाच)** पूर्णवेळ पदव्युत्तर शिक्षकांची (पैकी **दोन जागा महिलांसाठी** आणि **एक जागा अनुसूचित जमाती या** प्रवर्गासाठी राखीव आहे) **विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) निवडणूक.**

**परिनियम ३६६ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

(१) मंगळवार, दिनांक ६ सप्टेंबर, २०१० रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या मतदार यादीस परिनियम क्र. ३६४ अन्वये प्राप्त दुरुस्त्या विचारात घेऊन मा. कुलगुरु यांनी मान्य केलेल्या अंतिम मतदार यादीप्रमाणे या निवडणुका घेण्यात येत आहेत.

(२) **निवडणूकीसाठी जागा : एकूण ५**

१) खुला प्रवर्ग - २ जागा २) महिला - २ जागा ३) अनुसूचित जमाती - १ जागा (**S.T**)

**सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६,३६७) | शुक्रवार, दि. २२ ऑक्टोबर,२०१० सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| २ | उमेदवारी अर्जाची छाननीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७१) | शुक्रवार, दि. २२ ऑक्टोबर,२०१० सायंकाळी ५.०० वाजता. | क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारत, आरोग्य केंद्राच्या समोर पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७०, ३७५) | सोमवार, दि.२५ ऑक्टोबर, २०१० सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| ४ | निवडणूकीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६) | रविवार, दि.३१ ऑक्टोबर, २०१० सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | या निवडणूक सूचनेस जोडलेल्या परिशिष्टामधील मतदान केंद्रावर सदर निवडणूक घेण्यात येईल. |
| ५ | मतमोजणी | मंगळवार, दि. २ नोव्हेंबर, २०१० सकाळी ८.०० वाजता | क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारत, आरोग्य केंद्राच्या समोर, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |

उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घ्यावा आणि उमेदवारी अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १०/-(अक्षरी रुपये दहा फक्त) रोख स्वरुपात निवडणूक विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

(३) मतदार यादीत समाविष्ट असलेले संबंधित मतदारसंघातील कोणतेही दोन मतदार, मतदार यादीत समाविष्ट असलेल्या उमेदवारास सूचित किंवा अनुमोदित करू शकतात. (परिनियम ३६९)

(४) मतदार यादीत तीन किंवा तीनपेक्षा कमी मतदार असल्यास उमेदवार स्वतःचे नाव स्वतःच सूचित आणि/किंवा अनुमोदित करू शकतो. अन्यथा उमेदवार स्वतःचे नाव स्वतःच सूचित किंवा अनुमोदित करू शकणार नाही. (परिनियम ३६९)

(५) योग्य रितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी दाखल केलेले उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील. (परिनियम ३६७ व ३६९ )

(६) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर हे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३७२)

(७) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील, तर अशा उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल. सदर निवडणूक सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत निवडणूक कार्यक्रमात वर्णन केलेल्या मतदान केंद्रावर घेण्यात येईल.

(८) मतदाराने मतदानाच्या वेळी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा ते ज्या संस्थेत सेवेत आहेत तेथील नियोक्त्याचे ओळखपत्र किंवा सर्वसाधारण (जनरल) निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले ओळखपत्र, इन्कम टॅक्स कार्यालयाने दिलेले पॅनकार्ड किंवा तत्सम ओळखपत्र दाखविल्याशिवाय त्यांना मतपत्रिका मिळणार नाही.

(९) अर्ज छाननी, मतदान आणि मतमोजणीच्या वेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील त्यांचा एक प्रतिनिधी वेळेपूर्वी किमान अर्धा तास पूर्वसूचना देऊन हजर राहू शकतो.

(१०) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ सप्टेंबर, २००९ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राह्यतेसंबंधीच्या नियमांबाबत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ११३/२०१०, दि. २ ऑगस्ट, २०१० यांच्या प्रती विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statute या लिंकवर उपलब्ध आहेत.

(११) उमेदवार अनुक्रमांक १० मध्ये नमूद केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणारा असणे आवश्यक आहे

**(१२) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.**

१. पूर्णवेळ मान्यताप्राप्त पदव्युत्तर शिक्षक म्हणून ५ वर्षे अध्यापनाच्या अनुभवाचे प्राचार्य/संचालक यांचे प्रमाणपत्र व त्या पृष्टयार्थ विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत/प्रती. विद्यापीठ विभागातील पदव्युत्तर शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ विभागप्रमुख यांचे प्रमाणपत्र आणि जर उमेदवार स्वतः विभागप्रमुख असेल तर प्रशासन शिक्षक कक्षाचे प्रमाणपत्र.

२. पीएच.डी. प्रमाणपत्र किंवा तत्सम प्रमाणपत्र.

३. दिनांक १४/९/२००९ च्या राजपत्रान्वये विहित केलेल्या पात्रता शर्तीप्रमाणे पाच वेळा परीक्षेचे काम केल्याचे प्राचार्य/संचालक/विद्यापीठ विभागप्रमुख यांचे प्रमाणपत्र. उमेदवार स्वतः विद्यापीठ विभागप्रमुख असेल तर परीक्षा नियंत्रक यांचे प्रमाणपत्र.

४. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलसमध्ये बारकाईने पुनर्विलोकन केलेल्या किमान तीन शोधनिबंध प्रकाशित असल्याचा पुरावा.

५. पीएच.डी. मार्गदर्शक असल्यासंबंधीचे मान्यता पत्र.

६. जे उमेदवार राखीव प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसाठी त्यांचे जात प्रमाणपत्र.

मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन

गणेशखिंड, पुणे ४११००७
संदर्भ क्र. पुविनि/२५(२)(वाय)/ ३८१
दिनांक : ५ ऑक्टोबर, २०१०

( डॉ. मा. ल. जाधव )
**कुलसचिव**

**प्रति : सर्व संबंधित मतदार**

Bhor/Eelction 2010/PGTC/Notice of election 31 October

## Teachers, PG Teachers & Head of the College Departments Election Voting Centre List.

| Voting Centre No. | Voting Centre |
|---|---|
| | **PUNE DISTRICT** |
| 01 | Classroom Complex, Opp. Health Center, University of Pune, Pune-7 |
| 02 | Fergusson College, Pune |
| 03 | H V Desai College, Pune |
| 04 | MES's IMCC, Mayur Colony, Pune |
| 05 | Shivchatrapati Arts & Com. College, Vadgaon Bk. |
| 06 | P V G's College of Engineering, Parvati, Pune |
| 07 | Nowrosjee Wadia College, Pune |
| 08 | Annasaheb Magar College, Hadapsar, Pune |
| 09 | Mahatma Phule College, Pimpri Waghire |
| 10 | Arts, Comm. & Science College, Indapur, Dist. Pune |
| 11 | NES's Arts & Comm. College, Daund, Dist. Pune |
| 12 | Tuljaram Chaturchand College, Baramati, Dist. Pune |
| 13 | Waghire College, Saswad, Dist. Pune |
| 14 | Anantrao Thopate College, Bhor, Dist. Pune |
| 15 | Arts & Comm. College, Lonawala, Dist. Pune |
| 16 | C T Bora College, Shirur, Dist. Pune |
| 17 | Hutatma Rajguru College, Rajgurunagar, Dist. Pune |
| 18 | Annasaheb Awate College, Manchar, Dist. Pune |
| 19 | Shri Shivchatrapati College, Junnar, Dist. Pune |
| | **AHMEDNAGAR DISTRICT** |
| 20 | Pemraj Sarda College, A'nagar |
| 21 | R B N B College, Shrirampur, Dist. A'Nagar |
| 22 | K J Somaiyya College, Kopargaon, Dist. A'Nagar |
| 23 | B S T College, Sangamner, Dist. A'Nagar |
| 24 | PVP College, Pravaranagar, Dist. A'Nagar |
| 25 | Dada Patil College, Karjat, Dist. A'Nagar |
| 26 | Babuji Avhad College, Pathardi, Dist. A'Nagar |
| 27 | Arts, Comm. & Science College, Rahuri, Dist. A'Nagar |

| Voting Centre No. | Voting Centre |
|---|---|
| 28 | Shri Dnyaneshwar College, Newasa, Dist. A'Nagar |
| 29 | Agasti College, Akole, Dist. A'Nagar |
| 30 | New Arts, Comm. & Science College, Parner, Dist. A'Nagar |
| 31 | New Arts, Comm. & Science College, Shevgaon, Dist. A'Nagar |
| 32 | Shri Chatrapati College, Shrigonda, Dist. A'Nagar |
| 33 | Jamkhed College, Jamkhed, Dist. A'Nagar |
| | **NASHIK DISTRICT** |
| 34 | HPT College, Nashik |
| 35 | I. V H College, Panchvati, Nashik |
| 36 | RNC & JDB College, Nashikroad |
| 37 | GMD & SW College, Sinnar, Dist. Nashik |
| 38 | Arts, Comm. & Science College, Manmad, Dist. Nashik |
| 39 | N M Sonawane College, Satana, Dist. Nashik |
| 40 | K K Wagh College, Pimpalgaon Baswant, Dist. Nashik |
| 41 | Swami Muktanand Science College, Yeola, Dist. Nashik |
| 42 | M S G College, Malegaon Camp, Dist. Nashik |
| 43 | Arts, Comm. & Science College, Kalwan, Dist. Nashik |
| 44 | K R Aher College, Deola, Dist. Nashik |
| 45 | Dadasaheb Bidkar College, Peth, Dist. Nashik |